## (२) नदीचा परिचय

नदीचे नाव :- नंदिनी , प्रचिलित नाव :- नासरडी
ब्रिटिश गाझेट नोटिफिकेशन मध्ये नाशिक शहराला पिण्याचे पाणि उपलब्ध करून देणारी नाशिक शहाराचा मधोमध्य वाहणारी नदी. मौजे तळेगाव अंजेनेरी ता.जि. नाशिक या ठिकाणी सुपात्या (सुपा सारख्या आकाराचा विशाल व विस्थिर्ण डोंगर). डोंगरावर उगम आहे.
नंदिनी नदी ही गोदावरी या नदिची प्रमुख उप-नदी आहे. नंदिनी नदीचा उपनदया (ओढे) संतोषा ओढा, भागडी ओढा, ढोल्या उम्राचा ओहोळ, लहान संतोषा ओढा, नागडा ओढा, काजळी ओढा, पांजरापोळ ओढा, इत्यादी.

(a) नंदिनी नदी काटची ग्रामीण भागातिल व खोऱ्यातिल गावे ① तळेगाव अंजेनेरी, ② महिरावणि ③ बेलगाव ढगा ④ वासळी गाव ⑤ तिरडशेत गाव


(b) नाशिक महानगर पालिको हद्दीतिल गावे - ① पिंपळगाव बहूला ② सातपूर ③ अंबड ④ कामटवाडा ⑤ उंटवाडी नाशिकचा भाग - मुंबई नाका, वडाळनाका नासरडी पूल, टाकळी, व नांदुर

नंदीनी नदिची ग्रामिण भागातिल लांबी
a) उगम-स्थान ते तळेगाव अं. हद्द - २.११ कि.मी. (महिरावणी धरण क्षेत्र Backwater सुरु)
b) महिरावणी ते बेलगाव ढगा व वासाळी गाव हद्द (समान हद्द) परियंत लांबी - ४.३६ कि.मी.
c) वरील b) हद्द ते पिंपळगाव बहूला व तिरडशेत हद्द (समान हद्द) परियंत लांबी - ३.५७ कि.मी
एकुण ग्रामिण भागातिल लांबी
२.११ + ४.३६ + ३.५७ = १०.४ कि.मी.

नदीची शहरी भागातिल लांबी - १४.५८ कि.मी.
उगम स्थान ते नंदिनी-गोदावरी संगमापर्यंत = २५.६२ कि.मी. लांबी
(अगर टाकळी परिसर)


Latitude: 19.949135
Longitude: 73.644607
Accuracy: 2000.0 m
Time: 06-02-2024 18:18
Note: नंदिनी नदी उगम स्थान सुपात्या डोंगर तळेगाव अं
Powered by NoteCam


नकाशा क्षेत्र कॅल्क्युलेटर
9.06 mi(माईल)
June Dhagu
of Health
Sciences
Dari
Chambar Leni
Mungsare
26
MAKHMALABAD
Someshwar Water Fall
17
848
AMRUTDHAM
SATPUR COLONY
Nashik
30
INDIRA NAGAR
NASHIK ROA
MIDC AMBAD
PATHARDI PHATA
DEOLALI GA
160
Google


नकाशा क्षेत्र कॅल्क्युलेटर
6.23 mi(माईल)
YCMOU
Gangavhare
Mahiravni - Gangapur Rd
Wasali
848
848
Dudgaon
Sandip University
BELGAON
DHAGA
Talegaon
Anjaneri
Google

(3) नदी संवाद यात्रा :-

विश्वशांती हेतू जल-यात्रा याची सुरुवात २०१६ मध्ये डॉ. राजेंद्र सिंह (Waterman of India) यांचा हस्ते नंदिनी नदी उगम परिसरात सुरु झाली. या प्रसंगी तत्कालिन जिल्हाधिकारी डॉ. श्री. दिपेंद्र कुशवाह, प.स. नाशिक गटविकास अधिकारी श्री. रविंद्र परदेशि, संदिप फाउंडेशन महिरावणी येथिल विद्यार्थी व बेलगाव ढगा, महिरावणि, तळेगाव अं., वासाळी गाव, पिंपळगाव बहूला, तिरडशेत येथिल ग्रामस्त, ग्रामपंचायत पद-अधिकारी, जिल्हा परिशद शाळेचे विद्यार्थी, नमामि गोदा फॉउंडेशनचे श्री. राजेश पंडित व सरकारी अधिकारी व नागरिक बहूसंखेने उपास्थित होते. या प्रसंगी डॉ. राजेंद्र सिंह यांनी सद्याचे पाण्याचे महत्त्व, भविष्यातिल पाणि समस्या उगम स्थान परिसरात करावयाची आवश्यक कामे वृक्ष-रोपन, जैव-विकास संर्वधन, नदी स्वच्छता या बाबत उपास्थितांना मार्गदर्शन केले

चला जाणूया नदीला या उपक्रमा अंतर्गत मे-जून, २०२३ मध्ये भूजवळ नालेज सिटीचे विद्यार्थी व जल-प्रहरी स्थानिक ग्रामस्त या सह नंदिनी नदीची परिक्रमा केली सोबत नदीचा संपूर्ण परिचय करुण घेतला. नदी बारमही अविरल स्वच्छ कशी वाहत राहिल या उद्देशाने प्रचार-प्रसार, जनजागृती केली. वरिल परिक्रमे दर्म्याणची माहिती बाद WHATSAPP, FACEBOOK, इ. माध्यमातून जनजागृती पर माहिती प्रसारित केली.



विश्वशांती हेतु जलयात्रा
TARUN BHARAT SANGH
जल बिरादरी
WORLD WATER WALK
for PEACE

सुखद सोमवार

गोदा संवर्धन मोहिमेच्या सदस्यांकडून नदीचा अभ्यास, नंदिनी परिक्रमेतून शोधला जातोय गौरवशाली इतिहास

# गोदामाईच्या उपनद्यांना वाचविण्यासाठी सरसावले युवक

चंदन खतेले | सिडको

नोबेल पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ राजेंद्र सिंह यांच्या 'नदी वाचवा' अभियानाने प्रेरित होऊन शहरातील हजारो युवकांनी एकत्र येत गोदा संवर्धन मोहीम सुरू केली. जय बजरंग युवक प्रतिष्ठानच्या या मोहिमेत अनेक सामाजिक संघटना सहभागी झाल्या असून, गोदामाईच्या उपनद्यांची दुरवस्था पाहता नंदिनी परिक्रमा हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याद्वारे गौरवशाली इतिहास अभ्यासला जात असून, नाशिकसह त्र्यंबकेश्वरनगरीची माहिती सर्वसामान्यांपर्यंत यातून पोहोचत आहे.


सिडकोतील जय बजरंग युवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमित कुलकर्णी यांनी मित्रांना संघटित करत गोदा संवर्धन मोहीम हाती घेतली आहे. केवळ वर्षभरात त्यांच्या या मोहिमेला शहरासह जिल्ह्यातील अनेक सामाजिक संघटना जोडल्या गेल्या. वर्षभरात सुटीच्या दिवशी, शनिवार, रविवारी गोदा स्वच्छतेसाठी सर्वच प्रयत्नशील राहिले. यातून त्यांनी गोदावरीच्या उपनद्यांचा अभ्यास सुरू केला. शहरातून जाणाऱ्या गोदावरीला जोडल्या जाणाऱ्या नासर्डी अर्थात नंदिनी नदीची अवस्था एखाद्या नाल्यासारखी झाली आहे. या नदीला पुनर्वैभव उर्वरित. पान ६



नंदिनी परिक्रमेतून गौरवशाली इतिहास शोधण्यासाठी युवक अभ्यास करत आहेत. त्यांच्या माहितीतून नासर्डीची नंदिनी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

## अशी झाली नंदिनी परिक्रमा

नंदिनी परिक्रमा मोहिमेत त्र्यंबकेश्वर रस्त्यावरील गौरवशाली इतिहासाची साक्षीदार असलेली अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेली विहीर युवकांना पाहता आली. शेकडो फूट खोल ही विहीर अनेक वर्षांनंतरही वाटसरूंची तहान भागवत आहे. या मोहिमेत सुपाता डोंगरावर जाऊन नंदिनीच्या उगमस्थानाची पाहणी करण्यात आली. पाची डोंगर, लहान व मोठा संतोषा डोंगर, नागडा डोंगर व भागडी डोंगराचे या मोहिमेत युवकांनी निरीक्षण केले. याच पर्वतरांगांतून वाहणारा सांडीचा ओहोळ, गाव ओहोळ, ढोल्या उंबरचा ओहोळ, नागड्याचा ओहोळ अभ्यासता आला. याबाबत सरपंच दत्तात्रय ढगे यांनी माहिती दिली. निसर्गाने भरभरून सौंदर्याचे दान दिलेली पवित्र भूमी जवळ जाऊन युवकांना अभ्यासता आली.



(५) नदी खोऱ्यातिल वनक्षेत्रे आणि त्यांची स्थिती :-
नंदिनी नदी खोऱ्याला लाभलेले वनक्षेत्रे :-
1) तळेगाव अं. - १५० हेक्टर
2) महिरावणी - १५० हेक्टर
3) बेलगाव ढगा - १८५ हेक्टर
वरिल तिन गावांची वनक्षेत्रे ही नदी खोऱ्यांचा परिसरात येता (सोबत नकाशा)
नंदिनी नदीचा उगम स्थान असलेले तळेगाव अं. येथिल काही वनक्षेत्रे (४५ हेक्टर) वनविकास महामंडळ FDCM यांचा कडे साधारणपणे १५ वर्षा पुर्वी वन-विकासासाठी देण्यात आले आहे. परंतू या ठिकाणी CCT जल मृदा संदर्भाची संधारणाची व वृक्षरोपण संवर्धन इ. कामे अजूनही झालेली नाहित ही होणे आवश्यक आहे.
तळेगाव अं. वनक्षेत्र १५० हेक्टर एकूण आहे पैकी ४०-४२ हेक्टर सपाट वनक्षेत्रावर वन जमिनिंचे अति-क्रमण आहे. एकुण ११ वनतळे आहेत पैकी ६ जूने वनतळे यांची गाळ/माती काढणे अत्यआवश्यक आहे. वनक्षेत्रात लहान संतोषा, तळेगाव किल्ला, पाचीडोंगरी हा परिसर येतो जो बऱ्यापैकी मध्यम ते तिव्र उताराचा आहे. डोंगर उघडे-बोडके मात्र गवताळ आहे. सदर काही ठिकाणी भारतिय काटक वृक्ष प्रजाति लागवड व संगोपण होण्याचे गरजेचे आहे. असा परिसर ~~७०~~ ६०-६५ हेक्टर आहे.

महिरावणी वनक्षेत्र :-
यात संतोषा हा महत्त्वपूर्ण डोंगराचा ७०% भाग येतो. डोंगर बऱ्यापैकी जैवविविधतेणे संपन्न आहे तरी आणखी जैवविविधता वाढवण्या साठी वृक्षरोपणास वाव आहे. संतोषा डोंगरा पुढील उत्तर बाजु ही सपाट व सुपिक आहे. मात्र दूर्दैवाने हा बहूतांश (९०%) गुलमोरी व गिलिरिसिडिया या हानिकारक प्रजातिने व्यापला आहे. याचे टप्या-टप्याने उच्चटन होऊन भारतिय वृक्ष प्रजाति

झुडपे, वेली, गवताचे प्रकार, इ. लागवड व संगोपन होणे गरजेचे आहे. (PHOTO). या परिसरात जमेची बाजू म्हणजे वनतळे (CCT), डिप सि.सि.टी., दगडी बांध यांची योग्य व ~~आदर्श~~ आदर्श निर्मिती झाली आहे.

बेलगाव ढगा १८२ हेक्टर वनक्षेत्र:-

वन जमिनीचे अतिक्रमन ६० - ६५ हेक्टर. संतोषा व भागडी या दोन महत्त्वपूर्ण डोंगर रांगा जैवविविधता संपन्न आहे. नाशीक मधिल सर्वोत्तम सागवन जंगल, जल-मृदा संवर्धन संधारणाचे जिल्हातिल एक उत्कृष्ट काम झाले आहे. १६ वनतळ्यांचा गाळ काढणे आवश्यक आहे. इतर सपाट वनक्षेत्रात (७० - ८० एक्टर) मिश्र झाडे आहे. यात ग्लिरिशिडियाचे उच्चाटन करून वृक्ष-संवर्धन (भारतिय प्रजाति) होणे गर्जेचे आहे.

वरिल तिनही वनक्षेत्रे एक लगत आहे. यात बिबट, रान-डुक्कर, तरस, इ. वन्यप्राणि पशु-पक्षी, मुबलक प्रमाणात ~~आढळ~~ आढळतात.

त्रिरडशेत गावास वनक्षेत्र नाही मात्र वाद-ग्रस्त सरकारी जमिन आहे. या ठिकाणि वृक्षरोपन व्हावे वासाळी गावातिल वनक्षेत्राचे पाणि गोदावरी नदीला जाऊन थेट मिळते. वासाळी वनक्षेत्रातही जल-मृद संधारणा व वृक्षरोपन करण्यास मुबलक ~~वाव~~ वाव आहे. तेथेही ग्लिरिशीडिया मुबलक प्रमाणात आहे.


Latitude: 19.952027
Longitude: 73.68487
Elevation: 767.93±9 m
Accuracy: 1.6 m
Time: 12-28-2022 17:35
Note: बेलगांव ढगा संतोषा डोंगर
Powered by NoteCam


Latitude: 19.951958
Longitude: 73.68393
Elevation: 772.53±8 m
Accuracy: 1.3 m
Time: 12-28-2022 17:31
Note: बेलगांव ढगा भागडी डोंगर
Powered by NoteCam


Latitude: 19.96188
Longitude: 73.653437
Accuracy: 2600.0 m
Time: 06-02-2024 18:28
Note: पाची डोंगरी तळेगाव अं
Powered by NoteCam


BOMBAY FOREST SURVEY.
RESTRICTED
SHEET No. 193
TALUKA NASIK
DISTRICT NÁSIK
Mahirdoni
Belgaon Dhaga
TALEGAON
228
231
229
230
Sárola
Pimplad
JÁTEGAON
Bombay Forest Survey
RESTRICTED

(५) ३) नदी खोऱ्यातिल पिक पद्धती :-

नदी पात्रात दाळ व तेल-बिया पिक अतिअल्प प्रमाणात घेतले जाते. नाशिक तालुक्याची ओळख VEGETABLE BASKET OF ~~INDIA~~ MUMBAI म्हणुन आहे. खोऱ्यातिल गावांत टोमॅटो, कोबी, फॉवर, वेल-वर्गिय भाजिपाला, पालेभाज्या, कांदा, गहू, सोयाबिन, हरबरा, भात, नागली, इ. पिके घेतली जातात. यासाठी रासायनिक किडनाशके, रासायनिक खते-औषधी, इ. चा वापर होत असतो.

फळझाडांचे प्रकार द्राक्ष, पेरु, आंबा, इ. या भागात प्रगतशिल राज्यस्थरिय पुरस्कार प्राप्त शेतकरी आहे. जे मिश्र मिश्र सर्व प्रकारची शेती करतात. भाजीपाला व फळ बागांसाठी ड्रिप इरिगेशनचा वापर करतात मात्र कोबी-फॉवर या भाजीपाला पिकांना मोकळे (FLOOD) पाणि भरावे लागते. खोऱ्यातिल ~~[illegible]~~ तिन गावे मिळुण ३००-३२५ ~~[illegible]~~ रचा आसपास कोबी फॉवरची लागवड होते. यासाठी किमाण पाण्याचा वापर ~~६०-५०~~ ७.५० कोटी लिटर होतो. इतर पिकांना तुलनेने फक्त ७०-७५% पाणि लागते. ज'

जागतिक हवामान बदलामुळे शेतमाल उत्पादनाचे अनिच्यितता वाढलेली आहे. वार्षिक फळ-बागा पिकांचे नुकसान तर खुपच वाढलेले आहे. त्यामुळे परिसरातिल द्राक्षशेती निम्या पेक्षा ~~म~~ कमी झालेली आहे. हे द्राक्ष उत्पादक शेतकरी धान्य व इतर भाजीपाला शेतीकडे वळाले आहे.







(६) नदीच्या जमिनीवरील अतिक्रमण -

नदी पात्रात जागोजागी विहिरी आढळून येतात हि संख्या 30 च्या आसपास आहे.
शेती अतिक्रमण नाही
सातपुर - आयटीआय पुल - नासर्डी पुल द्वारका नजिक काही वस्त्या - पत्र्यांचे शेड इ. प्रकारची अतिक्रमणे नंदिनी नदी किनारी आहेत ती स्पष्ट दिसतात.

नंदिनी नदीला अतिरिक्त पुर आल्यावर नदी पात्रात रुंद ठिकाणी वाळु काही प्रमाणावर साचते ही वाळु स्थानिक लोक घरे बांधण्यासाठी अगर काही जण विक्री साठी काढतात

⑦ प्रदुषण

नंदिनि नदीचे शहरी भागातील प्रदुषण हे डोळ्याला स्पष्ट दिसते. पिंपळगाव बहुला, सातपुर, अंटवाटी, अंबड, नासर्डी पुल द्वारका या सर्व परिसरात बहुतांश शहरी नागरी वस्तीतुन निघणारे सांडपाणी थेट नदीपात्रात सोडलेले आहे. सिमेंट पाईपलाईन ड्रेनेजच्या जागोजागी गळती असलेल्या आहेत.

अंबड परिसरातील उप नाले ओढे हे औदयोगीक प्रदुषण वाहुन आणतात दुर्दैवाने यात काही अॅसिड कंपन्या सुद्धा आहेत.

ग्रामीण व शहरी वस्त्या या दोन्ही ठिकाणाहुन प्लास्टिक प्रदुषण नदी पात्रात होते. काही शेतकरी वापरुन झालेला मल्चींग पेपर नदी पात्रात फेकुन देतात.

(२) नदी खोऱ्यातील जैवविविधता

नदी उगमस्थान खोऱ्यात सुदैवाने मानवी वस्त्या खूपच कमी आहेत व जंगल आणि डोंगराळ भाग अधिक आहे त्यामुळे जैवविविधता उत्तम आहे,
उगमस्थान परिसरात स्थानिक मत्स्य जातीचे मासे मुबलक आढळतात, जस जशी नागरी वस्तीकडे नदी प्रवास करते तस तशी जैवविविधता कमी कमी होत जाते

[ सोबत जैवविविधता अहवाल ]

## (९) नदी खोऱ्यातील पशुधन व दुग्धउत्पादन

नदी खोऱ्यातील सर्वच गाव हे शेतीप्रधान आहेत शेतीला कृषि जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय हा प्रमुख व्यवसाय करतात त्यामुळे प्रत्येक गावात पशुधन मुबलक आहे. यात गाईंची संख्या अधिक आहे, त्याखालोखाल म्हशी - बकऱ्या यांची संख्या आहे. पर हंगामी उन्हाळ्यात परजिल्ह्यातून चराईसाठी आलेल्या मेंढ्या आढळून येतात



(१०) पिण्याच्या पाण्याची समस्या व उपाययोजना।

नदीनी नदीवर मौजे महिरावणी येथे महिरावणी धरण आहे धरणाची माहिती -

जलसाठा २.५२ निर्मिती - १९८२-८५

धरणाची लांबी ३९० मी..

धरण क्षेत्रात गाळमातीचे प्रमाण - २०-२५ % आहे

ते काढणे आवश्यक असून हे काम सुरु आहे.

धरण क्षेत्राच्या बांधाच्या पुर्व दिशेला महिरावणी, मळेगाव बेलगांव ढगा या तीन गावाला पाणीपुरवठा अवलंबून आहे. साधारणपणे एप्रिल मध्यावर धरणाची पाणी पातळी मृत साठा गाठते असा इतिहास आहे. यामुळे एप्रिल नंतर या तिन्ही गावांना पाणी टंचाई ला सुरुवात होते. हीच परीस्थीती नदी पात्रालगतच्या नागरिकांचीही होत असते.

उपाययोजना -

उगमस्थान परीसरात राहिलेली जल-मृदा संधारणाची वृक्षारोपणाची कामे लवकरात लवकर करणे महिरावणी धरणातील गाळमाती जी अतिरिक्त प्रमाणात साचलेली आहे ती काढून घेणे.

* वरील उल्लेखीत तिन्ही गावात जलशुद्धीकरण प्रकल्प आहेत. सोबत काही खाजगी व्यवसायीक पाणी पुरवठा जार (२० लिटर प्लास्टीक भांडे) द्वारा शुद्ध व थंड पेय जल पुरवठा मागणी केलेल्या नागरिकांना सशुल्क पुरवतात.

ग्रामपंचायत स्तरावर पाणी शुद्धीकरणासाठी जिल्हा-परिषद आरोग्य विभागाने ठरवुन दिलेल्या प्रमाणानुसार शुद्धीकरणासाठी क्लोरीनचा वापर केला जातो.


जलसंपदा विभाग
पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक
महाराष्ट्र शासन
महिरावणी प्रकल्प ठळक वैशिष्टे
अ. क्र.
परिमाण
प्रकल्प
महिरावणी
०१ जलाशयाचे स्थळ
०२ तालुका
०३ जिल्हा
०४ अक्षांश
०५ रेखांश
०६ गोदावरी नदीचे खोरे/उपखोरे
०७ क्रमांक
०८ अ) काम सुरू झाल्याचे वर्ष
०९
१० ब) काम संपल्याचे वर्ष
११ पाणलोट क्षेत्र
१२ बुडणारे क्षेत्र
१३ धरणाची लांबी
१४ सांडव्याची लांबी
१५ एकुण जलसाठा
१६ उपयुक्त जलसाठा
१७ अनुपयुक्त जलसाठा
१८ ५०% विश्वासर्हतेचा येवा
१९ अ) एकुण लाभ क्षेत्र (जी.सी.ए.)
२० ब) लागवडी योग्य क्षेत्र (सी.सी. ए.)
२१ क) सिंचन क्षेत्र (आय.सी.ए.)
२२ १) महत्तम धरण माथा (TBL)
२३ २) महापुर पातळी (MWL)
२४ ३) पुर्णसंचय पातळी (FRL)
२५ ४) सांडव्याचा माथ CRESTLEVEL
२६ ५) लघुतम जलपातळी (MDDL)
२७ ६) धरणातुन सरळविमोचक पातळी
महिरावणी
नाशिक
नाशिक
२०-५५-१२
७३-४२-३०
गोदावरी
१९८२
१९८५
१०.१
४९
३९०
८१
२.६३
२.५२
०.११
२.६३
६१०
७६०
५७६
५०७.००
५०५.५०
१०३.५
१०३.५
८८.६९
प्रतिबंधित क्षेत्र

Page No.
Date

११) नदी खोऱ्यातील जलस्रोत

नंदिनी नदीवर मौजे महिरावणी हे धरण आहे त्याची ~~स~~ माहिती
गोदावरी नदीची मुख्य उपखोरे
पाणलोट क्षेत्र १०.१, एकूण जलसाठा - २.५२
धरणाची लांबी ३९० मी. निर्मिती १९८२-८५
सद्य स्थितीत धरणात गाळ/माती २०-२५ %.
प्रमाणात साचलेला असून गाळ काढण्याचे काम सुरु आहे.

नंदिनी नदीवर ग्रामीण हद्दीपर्यंत ९ सिमेंट बंधारे असून पैकी २ पूर्ण नष्ट झाले आहेत. (तोडले आहेत) तर ४ बंधारे दुरुस्त करणे महिरावणी शिवारात गरजेचे आहेत.

काकी उपनद्यावर (ओढ्यावर) २०-२१ बंधारे असून त्याची दुरुस्ती टप्प्या टप्प्याने सुरु आहे.

याशिवाय वनराळे 70+ असून पैकी २०-२२ वनराळ्यांचा गाळ माती काढणे गरजेचे आहे.

गावतळे - ४ असून गाळ/माती काढण्यात आली आहे.


Latitude: 19.970677
Longitude: 73.695883
Elevation: 740.02±15 m
Accuracy: 7.0 m
Time: 11-25-2022 17:57
Note: बेलगांव ढगा कृषी नर्सरी
Powered by NoteCam


Latitude: 19.981952
Longitude: 73.684408
Elevation: 671.58±21 m
Accuracy: 6.3 m
Time: 02-26-2024 17:19
Note: Vasali Nandini nadi
Powered by NoteCam

(१२) नदी यात्रेदरम्यान जोडलेले शासकीय अधिकारी, संस्था आणि व्यक्ती

श्री. डॉ. राजेन्द्र सिंह - तरुणभारत संघ
श्री. पंकज गर्ग - DCF नाशिक
श्री. रविन्द्र परदेशी - जिल्हा परिषद उपकार्यकारी अधि.
श्री. प्रांत साहेब नाशिक
श्री. रविन्द्र सिंघल सर - रेन्बो फाऊंडेशन
श्री. नंदकुमार साखला - भारतीय जैन संघटना
श्री. राजेश पंडीत - नमामि गोदा फाऊंडेशन
श्री. अमरीश मोरे - वैनतेय संस्था
श्री. मनोज साठे - विजयश्री सेवा संस्था
श्री. रमेश अय्यर - गिव्ह वेल्फेअर संस्था
श्री. शेखर गायकवाड - आपलं पर्यावरण
श्री. अमित कुलकर्णी
श्री. चंद्रकिशोर पाटील

ग्रामपंचायत ग्रामसेवक व ग्रामपंचायत पदाधिकारी
महिरावणी, वासाळी, बेलगांव ढगा, तळेगांव, गिरडशेत
ग्रामस्थ शेतकरी,
जाणता राजा मित्र मंडळ, युवा केन्द्र तर्फे ल
अखिल भारतीय सरपंच परिषद-
शाम खोडबहाले, शांताराम ढकाण, अनुप भावले
मुंगी इंजिनिअर्स प्रा. लि.श्री. नाशिक अंबड.
>पंडक पगार खंडु पवार, समाधान खांडबहाले
समाधान गायकर, उत्तम खोडबहाले, ज्ञानेश्वर खोडबहाले, शांताराम निबेकर
परमानंद स्पोर्ट अॅकडमी सौ. अपर्णा कोठावळे
शाह फाऊंडेशन

(१३)

13] नदी यात्रेदरम्यान लोकांशी संवाद साधताना मिळालेली माहिती, निरीक्षणे व सूचना (कृती आराखडा).

१] नदी पूर्वी बारमाही व स्वच्छ पाणी असलेली होती नदी पुर्ववत झाली तर खुप चांगले होईल

२] जागो जागी विहिरे असायचे जे भर उन्हाळ्यात पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यायचे

३] शेतीला व पिण्याला मुबलक पाणी नदी मुळेच मिळायचे

४] या नदीवरच पाटपाणी पद्धती ~~उपलब्ध~~ अवलंबली जायची ज्यामुळे शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटायचा।

काही सूचना -

1] नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करावे

२] नदि किनाऱ्यावर बांबु लागवड करावी

३] आवश्यक ठिकाणी सिमेंट बंधारे बांधावेत

४] महिरावणी धरणाचा संपुर्ण गाळ काढावा

५] नदी पात्रात होणारे प्रदुषण थांबविण्यासाठी जनजागृती बरोबरच कायदेशीर मार्गाचा वापर करावा

६] उगमस्थान परिसरात चांगल्या भारतीय झाडांचे जंगल वाढवावे.

7) उगमस्थान परिसरातील भागात जल-मृदा संधारणाची राहीलेली कामे करावीत.

8) उपओहे नदया यांचेही खोलीकरण रुंदीकरण व्हावे.

9] नदीला पुन्हा रोटेशन पद्धतीने पाणी सोडावे


Time: 06-02-2024 08:36
Note: Belgaon Dhaga Santosha Odha Nandini Bambu Lagwad
Powered by NoteCam



१४) नदि खोऱ्यातील गावांची पुर व दुष्काळ या संदर्भातील ऐतिहासिक माहिती

– नदी खोऱ्याला 1972 चा सर्वात मोठा दुष्काळ पडला होता. जो वर्षभरासाठी होता मात्र या काळात कोरडवाहू ज्वारी पिक चांगले आले होते असे जुने शेतकरी सांगतात.

1972 च्या दुष्काळानंतर महिरावणी येथे धरणाचे काम सुरु झाले. ज्यामुळे नदी पात्रातील जवळच्या गावाच्या पाणी प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला गेला धरण बांधण्यासाठी महिरावणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कमी रोजदारीवर, धान्य मोबदल्यात काम केले होते.

पुरामुळे नदिनी नदी खोऱ्याला जास्त नुकसान झालेले नाही मात्र नदी पात्रात अतिक्रमण केलेल्यांचे अतिक्रमण अतिरिक्त पुरामुळे वाहुन गेले आहे. हा अनुभव 2013 व 2018 मध्ये आला आहे.

पुर व दुष्काळ निवारणासाठी नदी पात्राचे खोलीकरण रुंदीकरण आवश्यक आहे.

तसेच धरणाच्या अतिरिक्त गाळ/माती काढली जावी नदी किनाऱ्यावर झाडे लागवड करावी.

(१५) नदीला अविरल निर्मल व बारमाही वाहण्यासाठी तसेच गावाला जलसमृद्ध करण्यासाठी खालील पद्धती अवलंबल्या जात आहेत.

① नदिपात्रातील अतिरिक्त साचलेला गाळ/माती काढणे

② धरण क्षेत्रातील अतिरिक्त साचलेला गाळ माती काढणे

③ योग्य त्या भौगोलिक रचनेच्या व योग्य साईट वर छोट्या सिमेंट बंधाऱ्याची किंवा दगडी बंधाऱ्याची निर्मिती

④ नदीच्या उगमस्थान परिसरात जल-मृदा संधारणासाठी व वृक्ष लागवडीची कामे.

⑤ नदी किनाऱ्यावर दोन्ही बाजुनी वृक्ष (बांबू). लागवड करणे. संगोपन करणे.

⑥ शेती साठी मोकळे पाणी पद्धती बंद करणे/ कमी करणे. ठिबक सिंचनचा वापर करणे

⑦ जास्त पाणी लागणारी पिके न घेणे

⑧ पाण्याचा पुर्नवापरावर भर, शोषखड्ड्याचा वापर

⑨ रेन वॉटर हार्वेस्टिंग

⑩ बोअरवेल रिचार्ज करण्यासाठी उपाय करणे

⑪ शक्य त्या मोकळ्या जागावर जंगल निर्मिती.

⑫ शेतीची उताराच्या विरो. रोवजी आडवी नांगरट करणे.


महीरावणी धरण गाळ
माती काढण्याचे काम
सुरू आहे
TATA

१६)

नदी खोऱ्यातील भूजल पातळीची सद्य स्थिति व भूजल पातळी समृद्ध करण्यासाठी उपाययोजना।

नदी खोऱ्यातील ज्या गावात जल-मृदा संधारणाची कामे उत्तम झाली आहेत त्या गावातील भूजल पातळी चांगल्या प्रकारे वाढलेली दिसून आली उदा० डोलगांव ढगा गावात २०१५-१६-१७ या कालावधीत झालेल्या जलमृदा संधारणाच्या कामांमुळे येथील पाण्याची घसरत गेलेली पातळी ३०० फुटावरुन ११० फुटांवर उंचावली आहे.

अशीच कामे २०२२-२३ मध्ये महिरावणी वनक्षेत्रातही झाली आहे व होत आहे त्यामुळे या ही परिसरातील पाणि पातळी पुढील २-३ वर्षात उंचावली जाईल.

भूजल पातळी समृद्ध करण्यासाठी क्र. १५ मध्ये दिल्याप्रमाणे उपाययोजना कराव्या लागतील.

इतर महत्वाची माहीती.
सारांश स्वरूपात नंदिनी नदी बारमाही अविरत करण्यासाठी महत्वाची कामे व अपेक्षित अंदाजित खर्चासह.

(A) मौजे महिरावणी गाव ते पिंपळगाव बहुला गावांपर्यंत नंदिनी नदीचे खोलीकरण व रुंदीकरण (आलेखित साचलेला गाळ माती बाहेर काढणे.
लांबी - 7.93 K.m (30-35% भाग खडकाळ आहे).
साठी 210 पोकलॅन्ड मशिन लावून यासाठी 18-20 दिवस लागतील.
180-200 तास x 2000 रु. = 4,00000, (4 लाख रुपये).

(B) या दरम्यान एकुण ९ सिमेंट बंधारे असुन पैकी 4 नादुरुस्त आहेत
खर्च - जि.प. अंदाजित अंदाज पत्रकाप्रमाणे.
प्रति बंधारा - 7 लक्ष x 4 = ~~रु.~~ 28,00000 (28 लक्ष).
(जि. परिषद विभाग)

(C) नदीच्या दुतर्फा बांबु लागवड करणे
प्रती रोप अंतर 2 मीटर म्हणून 7.93 ÷ 2 = 3,965 x 2 (दुतर्फा)
7,930 बांबु रोपे अपेक्षित आहेत.
शेतकरी बांधव रोपे उपलब्ध झाल्यास स्वखर्चाने लावतील

(D) महिरावणी धरण अंतर्गत गाळ/माती काढणे (काम सुरू आहे).

(E) संगोवा ओढा अपेक्षित गाळ माती काढणे काम
80-90 तास = x 2000 = 1,80,000/-

(F) ~~(A)~~ भागडी ओढा अपेक्षित गाळ माती काढणे काम
70-80 तास = x 2000 रु. 1,60,000/-.

(G) ~~(B)~~ काजळी ओढा गाळ माती काढणे
60-70 तास x 2000 = 140,000 रु.

वरील तिन्ही E F व G ठिकाणी अपेक्षित बांबु रोपे = 9,000 रोपे.

माहितीचे महत्वाचे म्हणजे
नंदिनी नदीचा उगमस्थान असलेले वनक्षेत्र
वनविकास महामंडळ FDCM याचे ताब्यात आहे.
या ठिकाणी वनविभाग किंवा सुध्या
अंदाजपत्रकांप्रमाणे / नियोजनाप्रमाणे
जल-मृदा संधारणाची व जैवविविधता वाढिसाठी
कामे होणे अपेक्षित आहे.

जल ही जिवन है
जल है तो कल है

जय हो नंदिनी माता.


Latitude: 19.951573
Longitude: 73.694699
Elevation: 766.72±14 m
Accuracy: 2.3 m
Time: 10-05-2022 10:22
Note: बेलगांव ढगा वनतळे भागडी४
Powered by NoteCam


गाळ माती काढणे
आवश्यक आहे
Latitude: 19.981187
Longitude: 73.7004
Elevation: 659.56±27 m
Accuracy: 3.1 m
Time: 04-03-2023 19:05
Note: नंदीनी बेलगांव व पिंपळगाव बहुला मिलन
Powered by NoteCam


गाळ माती काढणे व
बंधारा दुरुस्ती आवश्यक
आहे
Latitude: 19.973195
Longitude: 73.671809
Elevation: 690.65±9 m
Accuracy: 1.7 m
Time: 04-03-2023 17:11
Note: नंदीनी महीरावणी एकनाथ खांडबहाले
Powered by NoteCam


Latitude: 19.967569
Longitude: 73.665167
Elevation: 690.69±4 m
Accuracy: 3.7 m
Time: 04-03-2023 17:02
Note: नंदीनी महीरावणी स्मशानभुमी
गाळ माती काढणे
आवश्यक आहे
Powered by NoteCam


Latitude: 19.964383
Longitude: 73.660813
Elevation: 701.31±7 m
Accuracy: 1.3 m
Time: 04-03-2023 16:54
Note: नंदीनी महीरावणी धरण
Powered by NoteCam


Latitude: 19.962978
Longitude: 73.649758
Accuracy: 2000.0 m
Time: 06-02-2024 17:55
Note: Mahiravani Forest  Glirishidya
अतिरिक्त ग्लिरीसीडीया काढून
या ठिकाणी भारतीय झाड
Powered by NoteCam